॥ श्रीनिवृत्तिमहाराजकृत हरिपाठाचे अभंग ॥

१

हरिविण दैवत नाहीं पैं अनुचित्तीं । अखंड श्रीपती नाम वाचे ॥ १ ॥
रामकृष्ण मूर्ति या जपा आवृत्ती । नित्य नामें तृप्ती जाली आम्हां ॥ २ ॥
नामाचेनि स्मरणें नित्य पैं सुखांत । दुजीयाची मात नेणो आम्ही ॥ ३ ॥
निवृत्ति जपतु अखंड नामावळी । हृदयकमळीं केशीराज ॥ ४ ॥

२

हरिविण चित्तीं न धरीं विपरीत । तरताती पतित रामनामें ॥ १ ॥
विचारुनी पाहा ग्रंथ हे अवघे । जेथें तेथें सांग रामनाम ॥ २ ॥
व्यासादिक भले रामनामापाठीं । नित्यता वैकुंठीं तयां घर ॥ ३ ॥
शुकादिक मुनि विरक्त संसारीं । रामनाम निर्धारीं उच्चारिलें ॥ ४ ॥
चोरटा वाल्मीकि रामनामीं रत । तोही एक तरत रामनामीं ॥ ५ ॥
निवृत्ति साचार रामनामी दृढ । अवघेचि गूढ उगविले ॥ ६ ॥

३

हरिमार्ग सार येणेंचि तरिजे । येरवीं उभिजे संसार रथ ॥ १ ॥
जपतां श्रीहरी मोक्ष नांदे नित्य । तरेल पैं सत्य हरि नामें ॥ २ ॥
काय हें ओखद नामनामामृत । हरिनामें तृप्त करी राया ॥ ३ ॥
निवृत्ति साचार हरिनाम जपत । नित्य हृदयांत हरी हरी ॥ ४ ॥

४

एकेविण दुजें नाहीं पैं ये सृष्टी । हें ध्यान किरीटी दिधलें हरी ॥ १ ॥
नित्य या श्रीहरि जनीं पैं भरला । द्वैताचा अबोला तया घरीं ॥ २ ॥
हरीविणें देवो नाहीं नाहीं जनीं । अखंड पर्वणी हरी जपतां ॥ ३ ॥
निवृत्ति साकार हरिनाम पाठ । नित्यता वैकुंठ हरिपाठ ॥ ४ ॥

५

जपतां कुंटिणी उतरे विमान । नाम नारायण आलें मुखा ॥ १ ॥
नारायण नाम तारक तें आम्हां । नेणों पैं महिमा अन्य तत्त्वीं ॥ २ ॥
तरिले पतित नारायण नामें । उद्धरिले प्रेमें हरिभक्त ॥ ३ ॥
निवृत्ति उच्चार नारायण नाम । दिननिशी प्रेम हरी हरी ॥ ४ ॥

६

एक तत्त्व हरि असे पैं सर्वत्र । ऐसें सर्वत्र शास्त्र बोलियलें ॥ १ ॥
हरिनामें उद्धरे हरिनामें उद्धरें । वेगीं हरि त्वरें उच्चारी जो ॥ २ ॥
जपता पैं नाम यमकाळ कांपे । हरी हरी सोपें जपिजे सुखें ॥ ३ ॥
निवृत्ति म्हणे हरिनामपाठ जपा । जन्मांतर खेपा अंतरती ॥ ४ ॥

७

गगनींचा घन जातो पैं वारेन । अवचिता पतन अधोपंथें ॥ १ ॥
अध ऊर्ध्व हरि भाविला दुसरी । प्रपंचबोहरी आपोआप ॥ २ ॥
निवृत्ति म्हणे जन हरीचें स्वरूप । कळाचें पैं माप हरिनाम ॥ ३ ॥

८

सृष्टीच्या संमता सुरतरु तरु । बोलिला विस्तारु धर्मशास्त्रीं ॥ १ ॥
नेघों हें तरु प्रपंचपरिवारु । प्रत्यक्ष ईश्वरू पुरे आम्हा ॥ २ ॥
निवृत्ति निवांत हरीच सेवित । दो अक्षरीं उचित इंद्रिया ॥ ३ ॥

९

सर्वांभूतीं दया शांती पैं निर्धार । योग साचार जनीं इये ॥ १ ॥
न लगे मुंडण काया हें दंडणें । अखंड कीर्तन स्मरे हरी ॥ २ ॥
शिव जाणें जीवीं रक्षला चैतन्य । हे जीवीं कारुण्य सदा भावीं ॥ ३ ॥
गगनीं सूर्य तपे अनंत तारा लोपे । एकची स्वरूपें आत्मा तैसा ॥ ४ ॥
उगवला कळीं उल्हासु कमळीं । तैसा तो मंडली चंद्र लेखा ॥ ५ ॥
निवृत्तिमंडळ अमृत सकळ । घेतलें रसाळ हरिनाम ॥ ६ ॥

१०

जयाचेनि सुखें चळत पैं विश्व । नांदे जगदीश सर्वा घटीं ॥ १ ॥
त्याचें नाम हरी त्याचें नाम हरी । प्रपंचबोहरी कल्पनेची ॥ २ ॥
शांति त्याची नारी प्रकृति विकारी । उन्मनी बोवरी हृदयांतु ॥ ३ ॥
निवृत्तिदेवीं साधिली राणीव । हरपले भाव इंद्रियांचे ॥ ४ ॥

११

हरीविण भावो वायांचि संदेहो । हरि देवो देवो आहे सत्य ॥ १ ॥
हरी हरी वाचे ऐसें जपा साचें । नाहीं त्या यमाचे मोहजाळ ॥ २ ॥
हरीविण सार नाहीं पैं निर्धार । हरिविण पार न पाविजे ॥ ३ ॥
निवृत्ति श्रीहरि चिंती निरंतरीं । हरि एक अंतरीं सर्वीं नांदे ॥ ४ ॥

१२

ध्यान धरा हरी विश्रांति नामाची । विठ्ठलींच साची मनोवृत्ति ॥ १ ॥
ध्यानेविण मन विश्रांतिविण स्थान । सूर्याविण गगन शून्य दिसे ॥ २ ॥
नलगे साकार विठ्ठल मनोवृत्ति । प्रपंच समाप्ति ती अक्षरीं ॥ ३ ॥
निवृत्ति समता विठ्ठल कीर्तन । करितां अनुदीन मन मेळे ॥ ४ ॥

१३

प्रपंचाची वस्ती व्यर्थ काया काज । आम्हां बोलता लाज येत सये ॥ १ ॥
काय करूं हरी कैसां हा गवसे । चंद्रसूर्य अंवसे एकसूत्र ॥ २ ॥
तैसें करूं मन निरंतर ध्यान । उन्मनी साधन आम्हां पुरे ॥ ३ ॥
निवृत्ति हरिपाठ नाम हेंचि वाट । प्रपंच फुकट दिसे आम्हां ॥ ४ ॥

१४

लटिका संसार वाढविसी व्यर्थ । विषयाचा स्वार्थ क्षणें करीं ॥ १ ॥
नको शिणों दुःखे का भरिसी शोकें । एकतत्त्वें एकें मन लावीं ॥ २ ॥
लावीं उन्मनीं टाळी टाळिसी नेई बाळी । अखंड वनमाळी हृदयवटी ॥ ३ ॥
निवृत्ति चपळ राहिला अचळ । नाहीं काळ वेळ भजतां हरी ॥ ४ ॥

१५

कल्पना काजळी कल्पिले कवळी । कैसेनि जवळीं देव होय ॥ १ ॥
टाकी हे कल्पना दुरित वासना । अद्वैत नारायणा भजें कां रे ॥ २ ॥
मोहाच्या जीवनीं नको करूं पर्वणी । चिंती कां आसनीं नारायण ॥ ३ ॥
निवृत्ति अवसरु कृष्णनाम पैं सारु । कल्पना साचारु हरी झाला ॥ ४ ॥

१६

मोहाचेनि देठें मोहपाश गिळी । कैसेनि गोपाळीं सरता होय ॥ १ ॥
मोहाचेनि मोहनें चिंतितां श्रीहरी । वाहिजु भीतरीं अवघा होय ॥ २ ॥
दिननिशीं नाम जपतां श्रीहरीचें । मग या मोहाचें मोहन नाहीं ॥ ३ ॥
निवृत्ति आगम मोहन साधन । सर्व नारायण एका तत्त्वें ॥ ४ ॥

१७

तिमिरपडळें प्रपंच हा भासे । झाकोळला दिसे आत्मनाथ ॥ १ ॥
हरीविण दुजें चिंतितां निभ्रांत । अवघेंचि दिसत माया भ्रम ॥ २ ॥
सांडूनि तिमिर सर्व नारायण । हेंचि पारायण नित्य करी ॥ ३ ॥
निवृत्ति सज्जन अवघा आत्मराज । एकतत्त्व बीज नाम लाहो ॥ ४ ॥

१८

प्रवृत्ति निवृत्ति या दोन्ही जनीं । वनीं काज करुनी असती ॥ १ ॥
नारायण नाम जपतांचि दोन्ही । एकतत्त्वीं करणी सांगिजे गुज ॥ २ ॥
आशेचे विलास गुंफोनिया महिमा । सत्त्वीं तत्त्व सीमा निजज्ञाने ॥ ३ ॥
निवृत्ति तत्त्वतां मनाचे मोहन । नित्य समाधानें रामनामें ॥ ४ ॥

१९

क्षेत्राचा विस्तार क्षेत्रज्ञवृत्ति । अवघी हे क्षिती एकरूपें ॥ १ ॥
शांति दया पैसे क्षमा जया रूप । अवघेची स्वरूप आत्माराम ॥ २ ॥
निंदा द्वेष चेष्टा अभिमान भाजा । सांडूनियां भजा केशवासी ॥ ३ ॥
निवृत्ति तिष्ठतु एकरूप चित्त । अवघींच समस्त गिळियेलीं ॥ ४ ॥

२०

आम्ही चकोर हरि चंद्रमा । आम्ही कळा तो पौर्णिमा ॥ १ ॥
कैसा बाहिजु भीतरी हरी । बिंब बिंबला एक सूत्रीं ॥ २ ॥
आम्ही देही तो आत्मा । आम्ही विदेही तो परमात्मा ॥ ३ ॥
ऐक्यपणें सकळ वसे । द्वैतबुद्धी कांहीं न दिसे ॥ ४ ॥
निवृत्ति चातक इच्छिताहे । हरिलागीं बरें तें पाहे ॥ ५ ॥

२१

ज्याचे मुखीं नाम अमृतसरिता । तोचि एक पुरता घटु जाणा ॥ १ ॥
नामचेनि बळे कळिकाळ आपणा । ब्रह्मांडा येसणा तोचि होय ॥ २ ॥
न पाहे तयाकडे काळ अवचिता । नामाची सरिता जया मुखीं ॥ ३ ॥
निवृत्ति नामामृत उच्चारी रामनामे । नित्य परब्रह्म त्याचे घरीं ॥ ४ ॥

२२

नित्य नाम वाचे तोचि एक धन्य । त्याचें शुद्ध पुण्य इये जनीं ॥ १ ॥
रामनामकीर्ति नित्य मंत्र वाचे । दहन पापाचें एका नामें ॥ २ ॥
ऐसा तो नित्यता पुढे तत्त्व नाम । नाहीं तयासम दुजें कोणी ॥ ३ ॥
निवृत्ति अव्यक्त रामनाम जपे । नित्यता पैं सोपें रामनाम ॥ ४ ॥

२३

अखंड जपतां रामनाम वाचे । त्याहूनी दैवाचे कोण भूमी ॥ १ ॥
अमृतीं राहिले कैचें मरण । नित्यता शरण हरिचरणा ॥ २ ॥
नाममंत्र रासी अनंत पुण्य त्यासी । नाहीं पैं भाग्यासी पार त्याच्या ॥ ३ ॥
निवृत्ति म्हणे सार रामनाम मंत्र । कैंचा त्यासी शत्रु जिती जनीं ॥ ४ ॥

२४

नाम नाहीं वाचे तो नर निर्दैव । कैसेनि देव पावेल तया ॥ १ ॥
जपे नाम वाचें रामनाम पाठें । जाशील वैकुंठे हरी म्हणता ॥ २ ॥
न पाहे पैं दृष्टीं कळिकाळ तुज । रामनाम बीज मंत्रसार ॥ ३ ॥
निवृत्ति म्हणे नाम जपावें नित्यता । आपणचि तत्त्वतां होईल हरी ॥ ४ ॥

२५

नामाचेनि बळें तारिजे संसार । आणिक विचार करूं नको ॥ १ ॥
नाम जप वेगीं म्हणे हरी हरी । प्रपंच बोहरी आपोआप ॥ २ ॥
नित्यता भजन देवद्विज करी । नाम हे उच्चारि रामराम ॥ ३ ॥
निवृत्ति जपतु राम राम वाचे । दहन पापाचें आपोआप ॥ ४ ॥

॥ इति श्रीनिवृत्तिनाथ हरिपाठ समाप्त ॥

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated January 25, 1999